तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक : २/एनजीसी/नियतठेव/शा-२८४१/२००६/१०९४
दिनांक : 24 नवम्बर NOV 2006

प्रति,-
अध्यक्ष,
नगाव एज्युकेशन सोसायटी, नगाव यांचे
गंगामाई कॉलेज ऑफ फार्मसी,
नगाव, ता. व जि. धुळे.

विषय : शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन संस्था सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.
संदर्भ : शासन निर्णय, क्र.टिईएम-२००६/(४८४/०६)/तांशि-१, दि. २०.११.२००६

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे शासनाने आपणास शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून खालील अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता | नियतठेवीची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | बी फार्मसी | ६० | रु. ८.०० लाख- प्रथम वर्ष<br>रु. ७.०० लाख- द्वितीय वर्ष |

सदर अभ्यासक्रमासाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संस्थाचालक यांच्या संयुक्त खात्यात नॅशनलाइज किंवा शेडयुल बँकेत प्रथम वर्षासाठी रुपये ८.०० लाख व पुढील शैक्षणिक वर्षात द्वितीय वर्षासाठी रुपये ७.०० लाख असे एकुण रुपये १५.०० लाख नियतठेव ५ वर्षासाठी जमा करावी. तसेच रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवरील नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास तात्काळ सादर करावे. (सोबत हमीपत्राच्या मसुद्याची प्रत जोडली आहे) सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याबाबतची माहिती कागदपत्रांच्या प्रतीसहीत या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

१. वरील अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आवश्यक असणारे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची माहिती खालील नमुन्यात उपरोक्त र.१००/- च्या स्टॅम्पपेपरवरील हमीपत्रात समाविष्ट करण्यांत यावी.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | शैक्षणिक अर्हता | पदनाम | नियुक्तीचा दिनांक | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|

8



Scanned by CamScanner

२ अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेचे पत्र, शासन मान्यतेचे प्रत, विद्यापीठाचे मान्यता पत्र इत्यादी पत्रांच्या प्रती.

३ सदर अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्ती पत्रे व रुजू झाल्याबाबतच्या पत्राच्या प्रती.

४ सदर अभ्यासक्रमासाठी खरेदी करण्यांत आलेल्या पुस्तकांची यादी व त्याबाबत पुरवठादाराला रक्कम अदा केल्याबाबतच्या पावत्यांचा क्रमांक, एकुण रक्कम यांची एकत्रित यादी

५ सदर अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारे संगणक व त्यासंबंधीची यंत्रसामुग्री तसेच फर्निचर बाबतची संख्यानिहाय यादी व पुरवठादाराला रक्कम अदा केल्याबाबतच्या पावत्याचा क्रमांक, एकुण रक्कम याची एकत्रित यादी.

तसेच वरील सर्व कागदपत्रांवर संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांच्या सह्या असणे आवश्यक आहे.

वरील बाबींची माहिती सादर केल्यानंतरच अभ्यासक्रम सुरु करण्याची या संचालनालयाची अंतिम परवानगी देण्यात येईल. या संचालनालयाची अंतिम परवानगी मिळाल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नयेत याची नोंद घ्यावी. तसेच आपल्या संस्थेची फी निर्धारित करण्यासाठी शिक्षण शुल्क समिती बांद्रे यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

आपला

( झेड. ए. शेख )
सहाय्यक संचालक, (अतां), तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई.

प्रत, १) मा.कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना मानार्थ सादर त्यांना विनंती करण्यांत येते की, उपरोक्त रक्कम संचालकांच्या संयुक्त खात्यात जमा केल्याची खात्री केल्याशिवाय विद्यार्थ्यांचे एनरॉलमेंट करु नये.

२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक यांना माहितीसाठी.

Inward No. 1146/30/11/2006

Scanned by CamScanner

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/फार्म./मान्यता/२०१३/9००९
दिनांक : 1 AUG 2013

प्रति,
प्राचार्य,
नगाव एज्युकेशन सोसायटीचे,
गंगामाई कॉलेज ऑफ फार्मसी,
नगाव, ता. जि. धुळे – ४२४ ००५.

(**Institute Code:- 5204**)

विषय : शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना-अनुदान तत्वावर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/१-७५३२१५७६२/२०१२/ईओए, दि. १० मे, २०१२.
२. शासन निर्णय, क्रमांक – टिईएम-२०१२/प्र.क्र.९८(भाग-१)/तांशि-४, दि. ३०.०६.२०१२

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून खालील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत खाली दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | बी.फार्मसी | ६० - १२० |

सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेसाठी कॅनरा बँक, शाखा- नगाव, धुळे, येथे पावती क्र. १२२४०६, दि. ०१.०६.२०१३, अन्वये रु.१.५० लाख संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच १००/- च्या स्टॅम्प पेपरवर शर्ती व अटी मान्य असल्याबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे. तरी वरील अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतावाढीस व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून या संचालनालयाकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१. सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेस **कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** यांची संलग्नता घ्यावी लागेल.

२. प्रवेशक्षमता वाढीस दिलेली मंजूरी विना-अनुदान तत्वावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे आवर्ती व अनावर्ती अनुदान शासनाकडून मंजूर केले जाणार नाही.

Scanned by CamScanner

३ विना-अनुदान पदवी अभ्यासक्रमाच्या बाबतीत वेळोवेळी राज्यशासन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद तसेच संचालनालयाकडून करण्यांत आलेल्या/येणा-या नियमांचे, प्रवेश नियमांचे, आरक्षण, शिक्षण शुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४. वाढीव प्रवेशक्षमतेसाठी विद्यापीठ व राज्यशासन यांच्या मानके व प्रमाणके नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्त करण्यांत यावी व त्यांना नियमांप्रमाणे वेतन व भत्ते देण्यात यावेत.

५. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

६. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट,१९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

७. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमाक व पासवर्डद्वारे** शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत,

१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा. **कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, **औरंगाबाद** यांना माहितीस्तव सादर.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.

Scanned by CamScanner